दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

गंगापूरात गुटखा विक्रीविरुद्ध कारवाई; मुद्देमाल जप्त

गंगापूर दि.२४: महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित गुटखा व तंबाखूजन्य पदार्थांची विक्री होत असल्याच्या गोपनीय माहितीवरून सहाय्यक पोलीस अधीक्षक गंगापूर व त्यांच्या पोलीस पथकाने दि. २३ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री राजीव गांधी चौक येथील 'ए-१ पान व टी कॉर्नर' येथे छापा टाकला. या कारवाईत विविध प्रकारचा प्रतिबंधित गुटखा, पान मसाला व तंबाखूजन्य पदार्थ असा एकूण ७,१०६ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अज्ञात कारच्या धडकेत वयोवृद्धाचा मृत्यू

देवळाली प्रवरा : अहिल्यानगर-मनमाड महामार्गावरील अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नसून, राहुरी एमआयडीसी परिसरात अज्ञात कारच्या धडकेत सायकलस्वार वयोवृद्ध रामदास शंकर शिंदे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे महामार्गावरील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. दि. २२ नोव्हेंबर रोजी रात्री रामदास शिंदे हे सायकलवरून राहुरी फॅक्टरीकडून राहुरीच्या दिशेने जात असताना सुतगिरणी परिसरात एका अज्ञात चारचाकी वाहनाने त्यांच्या सायकलला जोरदार धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी झाले.

छत्रपती संभाजीनगर ❀ बुधवार, दि. २५ नोव्हेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : २११ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

भारतीय नौदल आणि तटरक्षक दलासाठी हेलिकॉप्टर खरेदी प्रस्ताव

दिल्ली : भारतीय नौदल आणि भारतीय तटरक्षक दलाच्या जुन्या हेलिकॉप्टर ताफ्याचे आधुनिकीकरण करण्यासाठी मोठी तयारी सुरू आहे. दोन्ही दलांकडून सुमारे 15,000 कोटी रुपये खर्चून 76 नवीन युटिलिटी हेलिकॉप्टर खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे. या हेलिकॉप्टरमुळे जुन्या चीता आणि चेतक हेलिकॉप्टरची जागा घेतली जाणार आहे. या प्रस्तावानुसार, भारतीय नौदलाला 51, तर तटरक्षक दलाला 25 हेलिकॉप्टर मिळणार आहेत. संरक्षण सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकल्पात भारतीय कंपन्या परदेशी हेलिकॉप्टर उत्पादकांसोबत भागीदारी करणार आहेत. हेलिकॉप्टरचे उत्पादन भारतातच केले जाणार असून, ही खरेदी 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत होणार आहे. संरक्षण मंत्रालयाच्या उच्चस्तरीय बैठकीत लवकरच या प्रस्तावावर चर्चा होण्याची शक्यता आहे.

उत्तर प्रदेशात शिवसेनेची 35 जागांवर निवडणूक लढवण्याची तयारी

मुंबई : उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेनेही आपल्या निवडणूक तयारीला वेग दिला आहे. पक्षाने राज्यातील 35 विधानसभा जागा निश्चित केल्या असून तेथे आपले उमेदवार उभे करण्याची योजना आखली जात आहे. प्रयागराजमध्ये दाखल झालेल्या शिवसेनेचे राष्ट्रीय सचिव कॅप्टन अभिजित अडसूळ यांनी या नियोजनाची माहिती देत राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आणले आहे. आगामी निवडणुकीसाठी संघटनात्मक बांधणी आणि मतदारांपर्यंत पोहोचण्याची रणनीती आतापासूनच आखली जात असल्याचे स्पष्ट झाले असून पक्षाच्या हालचालींनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. अभिजित अडसूळ यांच्या मते, उत्तर प्रदेशातील शिवसेनेचा मुख्य निवडणूक अजेंडा हिंदुत्व असेल. त्यांचा पक्ष महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षासोबत (भाजप) युती सरकारमध्ये असला तरी उत्तर प्रदेशात आपले राजकीय अस्तित्व वाढवण्याची तयारी पक्ष करत आहे. भाजपसोबत युती करून निवडणूक लढवणे हे शिवसेनेचे पहिले प्राधान्य आहे. मात्र युती न झाल्यास किंवा जागावाटपावर सहमती न बनल्यास पक्ष एकट्यानेही निवडणूक लढवू शकतो, असा स्पष्ट इशाराही या भूमिकेतून दिला जात असून राजकीय समीकरणांची नव्याने जुळवाजुळव सुरू झाली आहे. प्रयागराजमध्ये माध्यमांशी बोलताना कॅप्टन अभिजित अडसूळ म्हणाले की, शिवसेना हिंदुत्वाचा अजेंडा घेऊन उत्तर प्रदेशातील जनतेपर्यंत जाईल. याच अजेंड्याच्या आधारे पक्षाने 35 विधानसभा जागा निश्चित केल्या आहेत. या जागांवर संघटना अधिक मजबूत करणे आणि निवडणूक प्रचार गतिमान करणे यावर भर दिला जात आहे. मथुरा प्रश्नाबाबत विचारले असता अडसूळ यांनी स्पष्ट केले की, मथुरा हा भाजपचा प्रश्न आहे, तर शिवसेनेचा प्रश्न हिंदुत्व आहे. भाजप आणि शिवसेना हे वेगवेगळे राजकीय पक्ष असून दोन्ही पक्षांची स्वतःची स्वतंत्र राजकीय प्राधान्यक्रम आहेत आणि प्रत्येक पक्ष आपल्या भूमिकेनुसार काम करतो.

दिवंगत खासदार डॉ. रामराव वडकुते यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

राज्यभरातील मान्यवरांची उपस्थिती; साश्रूनयनांनी दिला अखेरचा निरोप

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी



परभणी : हिंगोलीचे राज्यसभा खासदार डॉ. रामराव वडकुते यांच्या पार्थिवावर आज हिंगोली येथील महाकाली नगर परिसरात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राज्याच्या विधिमंडळातील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांसह मंत्री, लोकप्रतिनिधी, विविध क्षेत्रांतील मान्यवर, समाजबांधव, नातेवाईक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. साश्रूनयनांनी सर्व उपस्थितांनी डॉ. वडकुते यांना अखेरचा निरोप दिला. पोलिस दलाच्या वतीने हवेत तीन फैरी झाडून त्यांना मानवंदना देण्यात आली.

हिंगोली शहरातील महाकाली नगर परिसरात डॉ. वडकुते यांच्या अंत्यविधीस विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा हिंगोली जिल्ह्याचे पालकमंत्री नरहरी झिरवाळ, ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, मा.बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष तथा आमदार हेमंत पाटील, महाराष्ट्र राज्य कृषी मूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, आमदार प्रज्ञा सातव, आमदार तान्हाजी मुटकुळे, आमदार संतोष बांगर, आमदार राजू नवघरे, हदगावचे आमदार बाबूराव पाटील कोहळीकर, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी डॉ. वडकुते यांच्या सामाजिक कार्याचा गौरव केला. ते म्हणाले, डॉ. वडकुते यांनी अत्यंत संघर्षमय परिस्थितीतून पुढे येत गोरगरीब, उपेक्षित आणि वंचित घटकांच्या कल्याणासाठी आपले संपूर्ण जीवन समर्पित केले. सर्वसामान्य माणसाला विकासाचा केंद्रबिंदू मानून त्यांनी अहोरात्र समाजसेवा केली. त्यांच्या निधनाने वडकुते कुटुंबीयांसह सर्वांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या दुःखातून सावरण्याचे बळ त्यांच्या कुटुंबीयांना मिळावे आणि दिवंगत डॉ. वडकुते यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी, अशी प्रार्थना त्यांनी केली.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही डॉ. वडकुते यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले. ते म्हणाले, गेल्या 22 वर्षांच्या सहवासात त्यांच्याकडून खूप काही शिकायला मिळाले. अनेक पदे भूषवूनही त्यांनी कधीही पदाचा अभिमान बाळगला नाही. ते स्वतःसाठी नव्हे, तर लोकसेवेसाठी जगले. वाड्या-पाड्यांवरील गरीब आणि समाजातील शेवटच्या घटकाच्या कल्याणासाठी त्यांनी आयुष्यभर काम केले. राज्यसभेचे खासदार म्हणून त्यांनी वाड्या-पाड्यांसह धनगरवाड्यांच्या विकासाचे अनेक संकल्प केले होते. त्यांचे अपूर्ण कार्य आणि स्वप्ने पूर्ण करण्याची जबाबदारी आता समाजातील प्रत्येक घटकाची आहे. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राचे मोठे सामाजिक व राजकीय नुकसान झाले असे म्हणत महाराष्ट्र शासनाच्या वतीने डॉ. वडकुते यांना श्रद्धांजली अर्पण केली.

पालकमंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले, अत्यंत ग्रामीण आणि सर्वसामान्य कुटुंबातून पुढे आलेल्या डॉ. वडकुते यांनी आपल्या 72 वर्षांच्या आयुष्यातील सुमारे 40 वर्षे समाजसेवेसाठी खर्ची घातली. माणूस किती जगला यापेक्षा तो कसा जगला, याला अधिक महत्त्व असते. सामाजिक कार्यासाठी संपूर्ण जीवन समर्पित करून डॉ. वडकुते यांनी याचा आदर्श घालून दिला. त्यांच्या निधनाने संपूर्ण हिंगोली जिल्ह्यावर शोककळा पसरली असून, वडकुते यांच्या कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याचे बळ मिळावे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

कृषिमंत्री दत्तात्रय भरणे आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनीही डॉ. वडकुते यांच्या सामाजिक कार्याचा गौरव करत त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले. तसेच वडकुते कुटुंबीयांना धीर देत श्रद्धांजली अर्पण केली. आमदार हेमंत पाटील, आमदार प्रज्ञा सातव, आमदार तान्हाजी मुटकुळे, आमदार संतोष बांगर आणि आमदार राजू नवघरे यांनीही शोकसंवेदना व्यक्त केल्या. डॉ. वडकुते (वय 72) यांचे दि. 22 नोव्हेंबर रोजी दिल्ली येथील एम्स रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्यांचे पार्थिव दि. 23 नोव्हेंबर रोजी रात्री परभणी येथून हिंगोलीतील नाईक नगर येथील निवासस्थानी आणण्यात आले. यावेळी पोलिस दलाने त्यांच्या निवासस्थानी पार्थिवास मानवंदना दिली. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि पोलिस अधीक्षक श्रेणिक लोढा यांनी पुष्पचक्र अर्पण करून डॉ. वडकुते यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले. त्यानंतर अंत्ययात्रेस प्रारंभ झाला. हिंगोली शहरातील नाईक नगर येथील निवासस्थानापासून अग्रसेन चौक, इंदिरा गांधी चौक, महात्मा गांधी चौक, जवाहर रोड, पोस्ट ऑफिस, छत्रपती शिवाजी महाराज चौक, रिसाला बाजार आणि अकोला बायपास मार्गे अंत्ययात्रा महाकाली नगर येथे पोहोचली. येथे शासकीय इतमामात डॉ. वडकुते यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलिस दलाने हवेत तीन फैरी झाडून मानवंदना दिली. उपस्थितांनी दोन मिनिटे मौन पाळून दिवंगत खासदार डॉ. वडकुते यांना श्रद्धांजली अर्पण केली.

तत्पूर्वी माजी मंत्री महादेव जानकर, राजेश टोपे, गणेश हाके, शशिकांत तरंगे, बाळासाहेब किसवे, दीपक बोऱ्हाडे, गजानन घुगे, प्रा. लक्ष्मणराव हाके, भूषणसिंह महाराज होळकर, प्रकाशअण्णा शेंडगे, डॉ.विकास महात्मे, बाळासाहेब दोडकल्ले, डॉ. वडकुते यांचे जावई श्री.मदने आदींनीही शोकसंवेदना व्यक्त केल्या.

वेरूळमधील दुष्काळ निवारण बैठकीत विविध समस्यांचा पाढा

वनहक्क जमिनी, गावठाण हद्दवाढ, पीकविमा, प्रलंबित बिले आणि पाणीटंचाईच्या प्रश्नांवर आ प्रशांत बंब यांचे लक्ष



खुलताबाद प्रतिनिधी : गंगापूर-खुलताबाद विधानसभा मतदारसंघातील नागरिकांच्या विविध समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याच्या उद्देशाने आमदार प्रशांत बंब यांनी आज वेरूळ येथे दुष्काळ निवारणासंदर्भात बैठक घेतली. या बैठकीत जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे जि प चे माजी उपाध्यक्ष एल जी गायकवाड पंचायत समिती सदस्य दिनेश अंभोरे माजी सरपंच प्रकाश पाटील सतीश लोखंडे वेरूळसह परिसरातील शेतकरी, महिला, तरुण, ज्येष्ठ नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी आपल्या समस्या व मागण्या मांडल्या. नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांवर संबंधित विभागांच्या माध्यमातून पाठपुरावा करून ते सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन आमदार बंब यांनी दिले.

बैठकीत हितेश ठाकरे यांनी आदिवासी वनहक्क जमिनींचा प्रश्न उपस्थित केला. अनुसूचित जमाती प्रवर्गातील पात्र शेतकऱ्यांच्या वनहक्क जमिनींचे दावे तातडीने निकाली काढून जमिनी त्यांच्या नावे करण्यासाठी आमदारांनी पुढाकार घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालयांतर्गत वनहक्क समितीचा कार्यकाळ पूर्ण झाल्याने नवीन वनहक्क समितीची लवकरात लवकर स्थापना करण्यासाठी पाठपुरावा करण्याची मागणीही त्यांनी केली.

वेरूळ ग्रामपंचायत सदस्य साहेबराव पांडव यांनी गावठाण हद्दवाढीचा प्रश्न मांडला. गावठाण क्षेत्र वाढलेले असतानाही हद्दवाढीचा प्रश्न प्रलंबित असल्याने नागरिकांना नवीन मालमत्तांची रजिस्ट्री करताना अडचणी येत आहेत. त्यामुळे गावठाण हद्दवाढीचा प्रस्ताव वरिष्ठ स्तरावर तातडीने मार्गी लावावा, अशी मागणी त्यांनी केली. याशिवाय संजय गांधी निराधार योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेच्या लाभार्थ्यांची तहसील स्तरावरील बैठक अनेक दिवसांपासून झालेली नसल्याने अनेक अर्ज प्रलंबित आहेत. या अर्जांची तातडीने छाननी करून पात्र लाभार्थ्यांना मंजुरी द्यावी, अशी मागणी लोखंडे यांनी केली. चांगोबा वस्ती येथील रस्त्याचे काम व येळगंगा नदीवरील पुलाचे बांधकाम, पीकविमा भरूनही लाभ न मिळालेल्या शेतकऱ्यांना विम्याची रक्कम मिळवून देणे, तसेच रेशन कार्ड असूनही धान्यापासून वंचित असलेल्या नागरिकांना नियमित रेशन पुरवठा सुरू करणे, या प्रश्नांचाही त्यांनी उल्लेख केला.

गावठी दारू विक्रीवर छापा; 10 लिटर दारू जप्त

गणेश नगर-मुंडवाडी परिसरातील कारवाई; गुन्हा दाखल

कन्नड : अवैध गावठी दारू विक्रीविरोधात कन्नड शहर पोलिसांनी कारवाई करत एका ६८ वर्षीय महिलेकडून १० लिटर गावठी हातभट्टीची दारू जप्त केली. ही कारवाई मंगळवारी (दि. २४ नोव्हेंबर) दुपारी गणेश नगर-मुंडवाडी परिसरात करण्यात आली. याप्रकरणी शांता बाई अशोक गायकवाड (वय ६८, रा. गणेश नगर, मुंडवाडी, ता. कन्नड) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या तक्रारीनुसार, कन्नड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांच्या आदेशानुसार पोलीस पथक अवैध धंद्यांवर कारवाई करण्यासाठी गस्त घालत होते. यावेळी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार गणेश नगर-मुंडवाडी परिसरात एका महिलेच्या घरासमोरील ओट्यावर गावठी हातभट्टीची दारू विक्री सुरू असल्याचे समजले. त्यानुसार पोलिसांनी पंचांच्या उपस्थितीत संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी शांता बाई गायकवाड या प्लास्टिकच्या कॅनमधून गावठी दारूची विक्री करताना आढळून आल्याचे तक्रारीत नमूद आहे. पोलिसांनी १५ लिटर क्षमतेच्या प्लास्टिक कॅनमध्ये असलेली १० लिटर गावठी दारू जप्त केली. तिची किंमत प्रतिलिटर १५० रुपये याप्रमाणे १ हजार ५०० रुपये असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी पोलीस अंमलदार दत्तात्रय मार्कड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम १९४९ च्या कलम ६५ (फ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे

महामार्गावर रास्ता रोको केल्याप्रकरणी स्वाभिमानीच्या पदाधिकाऱ्यांसह 25 जणांवर गुन्हा

ऊसदर आंदोलनानंतर कन्नड पोलिसांची कारवाई; पानपोई फाट्यावरील वाहतूक रोखल्याचा ठपका

कन्नड : ऊसाला प्रतिटन ४ हजार २०० रुपये अंतिम भाव मिळावा, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने रविवारी (दि. २२ नोव्हेंबर) पानपोई फाटा परिसरात सोलापूर-धुळे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते. याप्रकरणी कन्नड शहर पोलिसांनी सोमवारी (दि. २३ नोव्हेंबर) सकाळी ७ वाजता संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसह २० ते २५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने रविवारी दुपारी १२ ते सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत हे आंदोलन करण्यात आले. जिल्हाध्यक्ष कृष्णा साबळे यांच्या नेतृत्वाखाली पानपोई फाटा येथे महामार्गाच्या दोन्ही बाजूंच्या मार्गांवर वाहने अडविण्यात आली. कोणतीही परवानगी न घेता महामार्गावरील वाहतूक रोखण्यात आल्याचा आरोप पोलिसांनी केला आहे.

आंदोलनादरम्यान बंदोबस्तावर असलेल्या पोलिसांनी रास्ता रोको न करण्याबाबत आंदोलकांना समजावून सांगितले होते. मात्र, त्यानंतरही आंदोलन सुरू ठेवून वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याची तक्रार कन्नड शहर पोलीस ठाण्यातील पोलीस कॉन्स्टेबल प्रदीप चव्हाण यांनी सरकारतर्फे दिली. त्यानुसार पोलिसांनी संबंधितांविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

या प्रकरणात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष कृष्णा साबळे, प्रदेश सदस्य भाऊसाहेब थोरात, मराठवाडा संघटक दिनकर पवार, तालुकाध्यक्ष प्रकाश बोरसे, दीपक शेजवळ (डोणगाव), रामेश्वर भुसारे (घाटशेंद्र), कन्नड विधानसभा अध्यक्ष शिवाजीराव बचाटे, डॉ. अण्णासाहेब शिंदे (विटा) यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांचा समावेश असल्याचे वृत्त आहे.

या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस निरीक्षक आर. बी. सानप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेडकॉन्स्टेबल सुभाष पवार करीत आहेत.

"ऊसाला प्रतिटन ४ हजार २०० रुपये भाव मिळावा, या रास्त मागणीसाठी आम्ही आंदोलन केले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी आवाज उठविणे हा आमचा अधिकार आहे. मात्र, मागण्यांकडे लक्ष देण्याऐवजी आंदोलकांवर गुन्हे दाखल केले जात आहेत. अशा कारवाईने आमचा लढा थांबणार नाही. शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा संघर्ष सुरूच राहील."
कृष्णा साबळे
जिल्हाध्यक्ष स्वाभिमानी शेतकरी संघटना

क्रीममध्ये सापडला पारा, मुलीची किडनी धोक्यात

केरळ : गोरे दिसण्याच्या हव्यासापोटी सोशल मीडियावरील जाहिरातींना भुलून फेअरनेस क्रीम वापरणे किती धोकादायक ठरू शकते, याचे गंभीर उदाहरण केरळमधील मलप्पुरम येथे समोर आले आहे. इन्स्टाग्रामवरील प्रमोशनल व्हिडिओ पाहून एका 17 वर्षीय मुलीने मागवलेली फेअरनेस क्रीम तिच्या आरोग्यासाठी घातक ठरल्याचा आरोप आहे. या क्रीमच्या वापरानंतर तिच्या शरीरात पाऱ्याचे प्रमाण धोकादायक पातळीवर पोहोचले आणि तिच्या किडनीला गंभीर इजा झाली. या प्रकरणाची दखल घेत केरळ राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाने स्वतःहून कारवाई सुरू केली आहे.

इन्स्टाग्रामवरील जाहिरात पाहून मागवली क्रीम

मलप्पुरम येथील एस्टर मिम्स मदर हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, मुलीने इन्स्टाग्रामवर काही सोशल मीडिया इन्फ्लुएंसर्सचे प्रमोशनल व्हिडिओ पाहिले होते.

या क्रीममुळे चेहऱ्यावरील मुरुम, काळे डाग आणि वांग कमी होतात, असा दावा जाहिरातींमध्ये करण्यात आला होता.







दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

'भैनी-भुली'चा नवा अध्याय

देशाच्या राजकारणात महिला मतपेढीचे महत्त्व अनन्यसाधारण बनले असून, विविध राज्यांत महिलांना थेट आर्थिक लाभ देणाऱ्या योजनांचा जणू काही ट्रेंडच सुरू झाला आहे. महाराष्ट्रातील 'लाडकी बहीण' आणि मध्य प्रदेशातील 'लाडली बहना' योजनेच्या यशानंतर, आता देवभूमी उत्तराखंडमध्येही मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांच्या सरकारने महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी 'भैनी-भुली' (मोठी बहीण-धाकटी बहीण) ही महत्त्वाकांक्षी योजना जाहीर केली आहे. चमोली जिल्ह्यातील पिपलकोटी येथे पार पडलेल्या मातृशक्ती परिषदेत मुख्यमंत्र्यांनी या योजनेची घोषणा केली असून, या अंतर्गत बचत गटांशी जोडलेल्या पात्र महिलांना १०,००० रुपयांचे प्रारंभिक प्रोत्साहन थेट त्यांच्या बँक खात्यात जमा केले जाणार आहे. स्थानिक बोलीतील नावामुळे महिलांशी भावनिक नाळ जोडण्याचा प्रयत्न करतानाच, ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा सरकारचा हा प्रयत्न वरकरणी अत्यंत स्वागतार्ह वाटतो. या योजनेची आर्थिक बाजू पाहिल्यास, राज्यात सुमारे साडेपाच लाख महिला स्वयं-सहायता गटांशी जोडलेल्या आहेत, त्यापैकी सुमारे साडेतीन लाख महिला यापूर्वीच 'लखपती दीदी' बनल्या आहेत. उर्वरित महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी किंवा सध्याच्या उद्योगाचा विस्तार करण्यासाठी दहा हजार रुपयांचे हे भांडवल निश्चितच मोठा आधार ठरणार आहे. विशेषतः डोंगराळ आणि दुर्गम भागातील कुटुंबांचा आर्थिक डोलारा सांभाळणाऱ्या उत्तराखंडच्या महिलांना यामुळे आत्मविश्वास मिळेल आणि स्थानिक उत्पादनांच्या व्यापारालाही गती प्राप्त होईल. सुमारे ५५० कोटी रुपये खर्चाच्या या योजनेचा पहिला हप्ता लवकरच खात्यात जमा करण्याची प्रशासकीय तयारीही वेगाने सुरू झाली आहे. मात्र, या लोकोपयोगी योजनेभोवती आता जोरदार राजकीय वारे वाहू लागले आहेत. राज्याचे कॅबिनेट मंत्री भरत सिंह चौधरी यांनी ही योजना आगामी विधानसभा निवडणुकीत 'गेम-चेंजर' ठरेल, असे विधान केल्यामुळे विरोधकांच्या हाती आयते कोलीत मिळाले आहे. निवडणुका तोंडावर आल्यानंतरच सरकारला महिलांची आठवण का झाली, असा सवाल उपस्थित करत काँग्रेसने या योजनेच्या टायमिंगवर आणि हेतूवर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. एकंदरीत, कल्याणकारी योजनांमधून महिलांना स्वावलंबी बनवणे हे कोणत्याही सरकारचे कर्तव्यच आहे; परंतु अशा योजना केवळ निवडणुकीपुरत्या मर्यादित न राहता, त्यातून खऱ्या अर्थाने महिला उद्योजक घडल्या तरच या 'भैनी-भुली' योजनेचे सार्थक होईल, अन्यथा ती केवळ राजकीय जुमला ठरण्याचा धोका नाकारता येत नाही.

नवीन घराच्या बांधकामातून 50 हजारांचे वायरिंग लंपास; कन्नडमध्ये चोरीची घटना

अज्ञात चोरट्यांविरुद्ध पोलिसांत तक्रार

कन्नड :दि.२४ नोव्हेंबर - शहरातील नितीननगर परिसरात नवीन घराचे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणाहून अज्ञात चोरट्यांनी सुमारे ५० हजार १०० रुपये किमतीचे विद्युत वायरिंग साहित्य चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. ही चोरी २१ नोव्हेंबर रोजी रात्री १.३० वाजेच्या सुमारास घडल्याचे तक्रारीत नमूद आहे.

याप्रकरणी अब्दुल रहमान अल अमोदी (वय ४२, व्यवसाय शेती, रा. मिल्लत प्लॉट, शिवाजीनगर, कन्नड) यांनी २४ नोव्हेंबर रोजी पोलिसांत तक्रार दिली आहे.

तक्रारीनुसार, नितीननगर येथील त्यांच्या नवीन घराचे बांधकाम सुरू आहे. बांधकामाच्या ठिकाणी विद्युत वायरिंगचे साहित्य ठेवण्यात आले होते. २१ नोव्हेंबरच्या रात्री अज्ञात चोरट्यांनी बांधकामाच्या ठिकाणी प्रवेश करून विविध प्रकारच्या विद्युत तारा तसेच पीओपीमधील वायरिंग कापून चोरून नेले.

चोरीस गेलेल्या साहित्यामध्ये १ एमएम, २.५ एमएम आणि ६ एमएम आकाराच्या पॉलीकॅब कंपनीच्या विद्युत तारा तसेच पीओपीमधील वायरिंगचा समावेश आहे. या सर्व साहित्याची एकूण किंमत ५० हजार १०० रुपये असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या घटनेप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली असून अज्ञात चोरट्यांचा शोध घेऊन कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. अधिक तपास पोलिस हेडकॉन्स्टेबल मोईस बेग हे करत आहे

स्मशान वैराग्य... क्षणिक पश्चात्ताप की कायमस्वरूपी परिवर्तन?

माणसाच्या आयुष्यात काही प्रसंग असे असतात, जे त्याला अंतर्मुख करतात. काही क्षणांसाठी आपण स्वतःच्या वागण्याचा, विचारांचा आणि आयुष्याच्या प्रवासाचा आढावा घेतो. आपल्या चुका जाणवतात, इतरांना दुखावल्याची जाणीव होते आणि यापुढे आपण नक्कीच बदलले पाहिजे, असे मनापासून वाटते. मात्र काही काळानंतर परिस्थिती बदलते आणि पुन्हा आपण त्याच जुन्या वर्तनाकडे वळतो. याच क्षणिक जाणीवेला आणि तात्पुरत्या वैराग्याला 'स्मशान वैराग्य' असे म्हणता येईल.

स्मशानभूमीत एखाद्या व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासाठी गेल्यानंतर आयुष्याचे वास्तव प्रकर्षाने जाणवते. पैसा, पद, प्रतिष्ठा, सत्ता, अहंकार, हेवेदावे आणि मत्सर या सगळ्या गोष्टी किती क्षणभंगुर आहेत, याची जाणीव होते. कालपर्यंत अधिकार गाजवणारा माणूस आज निश्चल पडलेला असतो. त्याच्या आयुष्यभराच्या धडपडीचा शेवट मूठभर राखेत झालेला पाहून मनात विचार येतो की, आपणही एक दिवस याच मार्गाने जाणार आहोत. मग एवढा अहंकार, द्वेष आणि संघर्ष कशासाठी?

मात्र स्मशानातून बाहेर पडल्यानंतर काही दिवसांतच हे विचार मागे पडतात. पुन्हा तेच राग, मत्सर, अहंकार आणि स्वार्थ सुरू होतो. कालपर्यंत क्षुल्लक वाटणाऱ्या गोष्टी पुन्हा महत्त्वाच्या वाटू लागतात.

असे स्मशान वैराग्य केवळ स्मशानभूमीपुरते मर्यादित नसते. आपल्या दैनंदिन जीवनातही त्याची अनेक उदाहरणे पाहायला मिळतात.

एखादी व्यक्ती अनेक वर्षे एका कार्यालयात काम करते. त्या कार्यालयातून बदली किंवा सेवानिवृत्तीच्या वेळी निरोप समारंभ आयोजित केला जातो. त्यावेळी संपूर्ण सेवाप्रवास डोळ्यांसमोर उभा राहतो. आपण कोणाला दुखावले, कोणाशी अनावश्यक वाद घातले, कोणाचा अपमान केला, याची जाणीव होते. निरोपाच्या भाषणात आपण म्हणतो, यापुढे सर्वांशी चांगले संबंध ठेवायचे, कोणालाही दुखवायचे नाही. पण नवीन कार्यालयात रुजू झाल्यानंतर पुन्हा तेच हेवेदावे, मत्सर, इर्षा आणि गटबाजी सुरू होते. म्हणजे निरोपाच्या दिवशी झालेली जाणीव केवळ त्या दिवसापुरतीच मर्यादित राहते.

व्यसनाच्या बाबतीतही असेच घडते. एखाद्या व्यसनी व्यक्तीला व्यसनामुळे स्वतःचे आणि कुटुंबाचे होणारे नुकसान दिसते. कुटुंबीयांचे अश्रू, आर्थिक अडचणी आणि आरोग्यावरील परिणाम पाहून मन हेलावते. आता पुन्हा व्यसन करायचे नाही, असा निर्धारही केला जातो. मात्र काही दिवसांनी तीच व्यक्ती पुन्हा व्यसनाकडे वळते. पश्चात्ताप होतो, निर्धार केला जातो; पण प्रत्यक्ष कृतीत बदल घडत नाही.

काही व्यक्तींच्या प्रामाणिकपणाचीही अशीच गंमत असते. जोपर्यंत चुकीचे काम करण्याची संधी मिळत नाही, तोपर्यंत ते प्रामाणिकपणाचे मोठमोठे दाखले देतात. मात्र संधी मिळताच आपली भूमिका बदलतात. जोपर्यंत लाभ मिळत नाही, तोपर्यंत तत्त्वज्ञान आणि प्रामाणिकपणाच्या गोष्टी; पण लाभाची संधी दिसताच तत्त्वांना तिलांजली! अशा वृत्तीला 'संधी नसताना साधू आणि संधी मिळताच संधीसाधू' असे म्हणावे लागेल. प्रामाणिकपणा हा संधी मिळाली नाही म्हणून असलेला नसावा, तर संधी असूनही चुकीचे काम न करण्याच्या भूमिकेतून आलेला असावा.

एखाद्याशी भांडण झाल्यानंतरही काही काळ मनात पश्चात्तापाची भावना निर्माण होते. आपण उगाच वाद घातला, नको ते बोललो, आता यापुढे शांत राहायचे, कोणाशीही भांडायचे नाही, असे वाटते. पण काही काळ लोटल्यानंतर पुन्हा तोच राग, तोच अहंकार आणि त्याच वादांची पुनरावृत्ती होते. म्हणजे पश्चात्ताप होतो, पण त्यातून शिकण्याची तयारी नसते.

या सर्व उदाहरणांमध्ये एक समान धागा आहे. तो म्हणजे एखाद्या प्रसंगामुळे मनात निर्माण होणारी जाणीव, बदलण्याची इच्छा आणि त्यानंतर पुन्हा जुन्याच वर्तनाकडे होणारी वाटचाल. केवळ भावना निर्माण होणे म्हणजे परिवर्तन नव्हे. त्या भावनेचे कृतीत रूपांतर होणे महत्त्वाचे आहे.

खरे तर आयुष्य किती मोठे आहे यापेक्षा ते किती चांगले जगलो, हे महत्त्वाचे आहे. पद, पैसा, प्रतिष्ठा आणि अधिकार यांचा उपयोग माणसे जोडण्यासाठी व्हावा, माणसे तोडण्यासाठी नव्हे. मतभेद असावेत, पण मनभेद नसावेत. स्पर्धा असावी, पण द्वेष नसावा. स्वाभिमान असावा, पण अहंकार नसावा. कारण शेवटी आपल्या पदाची किंवा संपत्तीची नव्हे, तर आपल्या वागणुकीची आणि माणुसकीची आठवण लोकांच्या मनात राहते.

स्मशानभूमीत जाऊन आयुष्याचे सत्य समजणे ही मोठी गोष्ट नाही; निरोपाच्या दिवशी पश्चात्ताप होणे, भांडणानंतर चूक जाणवणे किंवा नुकसान पाहून बदलण्याचा निर्धार करणेही पुरेसे नाही. त्या जाणीवा आपल्या रोजच्या वागण्यात उतरवणे, हेच खरे परिवर्तन आहे.

शेवटी एकच प्रश्न स्वतःला विचारायला हवा, प्रत्येक वेळी एखादा प्रसंग घडल्यावरच आपण चांगले वागण्याचा निर्धार करणार आहोत की कोणताही प्रसंग घडण्याची वाट न पाहता आजपासूनच स्वतःमध्ये बदल घडवणार आहोत?

कारण स्मशान वैराग्य क्षणिक असते; पण त्यातून मिळालेली शिकवण आयुष्यभर टिकली, तरच त्या वैराग्याला खरा अर्थ प्राप्त होतो.

लक्ष्मण ज्ञा. खटिंग
जवळा (स.) ता. जि.परभणी हल्ली मुक्काम नांदेड
९९६०९१००६४

संविधान समाजात पेरणारा माणूस!

''संविधानाची प्रत हातात देणे ही केवळ भेट नव्हे, तर लोकशाही मूल्यांची पेरणी; तीन हजारांहून अधिक प्रतींच्या वाटपातून संविधानिक साक्षरतेचा जागर''

२६ नोव्हेंबर हा दिवस भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस. याच दिवशी १९४९ मध्ये संविधान सभेने भारतीय संविधान स्वीकारले. एका अर्थाने हा दिवस भारताने स्वतःला न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांशी बांधून घेण्याचा दिवस आहे. परंतु, संविधान स्वीकारणं आणि संविधान जगणं या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. संविधानाचा खरा सन्मान केवळ त्याला अभिवादन करण्यात नाही, तर त्यातील मूल्ये आपल्या आचरणात उतरविण्यात आहे. हीच जाणीव समाजात रुजविण्यासाठी काही माणसे निष्ठेने काम करतात. सामाजिक कार्यकर्ते डॉ.हुलगेश चलवादी हे त्यापैकीच एक.

समाजसेवक मरिआप्पा चलवादी यांचा सामाजिक कार्याचा वारसा लाभलेल्या डॉ.चलवादी यांनी सामाजिक परिवर्तनाचा ध्यास घेतला आहे. तळागाळातील सामान्य माणसाला मुख्य प्रवाहात आणणे, शिक्षणाचा प्रसार करणे आणि सामाजिक न्यायाची जाणीव निर्माण करणे, हा त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू राहिला आहे. मात्र, त्यांच्या सामाजिक कार्यातील एक विशेष उपक्रम लक्ष वेधून घेतो. तो म्हणजे संविधानाच्या प्रतींचे सातत्याने केले जाणारे वाटप. संविधान समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचावे, प्रत्येक घरात त्याचे वाचन व्हावे आणि प्रत्येकाच्या विचारांत संविधानिक मूल्यांची पेरणी व्हावी, या भावनेतून त्यांनी हा उपक्रम हाती घेतला.

२०१८ मध्ये चलवादी शिक्षण संस्थेच्या पुणे इंटरनॅशनल स्कूल आणि ज्युनियर कॉलेजमधून या उपक्रमाची सुरुवात झाली. डॉ.प्रशांत पगारे आणि अशोक शिलवंत यांच्या सहकार्याने संविधानाच्या प्रतींचे वाटप करण्यात आले. त्याच वर्षी सोलापूर ते मुंबईतील चैत्यभूमीपर्यंत संविधान रॅली काढण्यात आली. या रॅलीच्या माध्यमातून संविधानाचा प्रचार आणि प्रसार करण्यात आला. हा उपक्रम एका दिवसापुरता मर्यादित राहिला नाही. दरवर्षी पुण्यातील शाळा आणि महाविद्यालयांमध्ये संविधानाच्या उद्देशिकेचे वाटप केले जाते. मागील वर्षी उद्देशिका लेखन स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले होते. अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांना संविधानाशी जोडण्याचा प्रयत्न सुरू आहे.

आजपर्यंत डॉ. चलवादी यांनी तीन हजारांहून अधिक संविधानाच्या प्रतींचे वाटप केले आहे. विद्यार्थी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, शासकीय अधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांपर्यंत त्यांनी संविधान पोहोचविले आहे. कुणाला भेटायला गेले, एखादा विवाहसोहळा असो किंवा सार्वजनिक कार्यक्रम, अशा प्रत्येक प्रसंगी संविधानाची प्रत भेट देण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. ही बाब वरकरणी साधी वाटू शकते. परंतु तिच्यामागे एक मोठा सामाजिक विचार आहे.

एखाद्याला पुष्पगुच्छ दिला तर त्याचा सुगंध एक-दोन दिवस टिकतो. मात्र, संविधानाची प्रत भेट दिली तर तिच्यातील विचारांचा सुगंध आयुष्यभर दरवळू शकतो. पुष्पगुच्छ काही काळ आनंद देतो; संविधान माणसाला विचार करायला शिकवते. आपल्या अधिकारांची जाणीव करून देते. इतरांच्या अधिकारांचा आदर करायला शिकवते. म्हणूनच संविधानाची प्रत ही केवळ पुस्तकाची भेट नसते. ती एका जागरूक आणि जबाबदार नागरिकाच्या निर्मितीची सुरुवात असते.

भारतीय संविधान हे केवळ कायद्याचे पुस्तक नाही. ते भारताच्या सामाजिक परिवर्तनाचा जाहीरनामा आहे. हजारो वर्षांच्या सामाजिक विषमतेला आव्हान देणारे ते एक प्रभावी साधन आहे. संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार दिला. धर्म, जात, भाषा, लिंग किंवा जन्मस्थानाच्या आधारावर भेदभाव नाकारला. व्यक्तीच्या प्रतिष्ठेला केंद्रस्थानी ठेवले. सामाजिक आणि आर्थिक न्यायाची दिशा दाखविली. लोकशाही ही केवळ मतदानापुरती मर्यादित नसून ती सामाजिक जीवनातही उतरली पाहिजे, असा व्यापक विचार संविधानातून व्यक्त होतो.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून देशाला दिलेला हा अमूल्य वारसा आहे. त्यांनी राजकीय लोकशाहीसोबत सामाजिक लोकशाहीचेही महत्त्व अधोरेखित केले. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही तत्त्वे एकमेकांपासून वेगळी करता येत नाहीत, हा त्यांचा आग्रह होता. कारण सामाजिक जीवनात समता नसेल, तर राजकीय लोकशाहीची मुळे कमकुवत राहतील. त्यामुळे संविधानाचे वाचन करणे म्हणजे केवळ कायदे समजून घेणे नव्हे. तर भारतीय समाजाची रचना, त्यातील विषमता आणि परिवर्तनाची दिशा समजून घेणे होय.

आजही समाजातील मोठ्या वर्गाला संविधानातील मूलभूत अधिकार, नागरिकांची कर्तव्ये आणि लोकशाही संस्थांची भूमिका यांची पुरेशी माहिती नाही. अनेकदा संविधानाचा उल्लेख केवळ राजकीय भाषणांपुरता किंवा विशिष्ट दिवसांच्या कार्यक्रमांपुरता मर्यादित राहतो. संविधानाची उद्देशिका वाचली जाते; पण तिचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न कमी होतो. न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता हे शब्द केवळ घोषवाक्ये न राहता दैनंदिन जीवनाचा भाग झाले पाहिजेत. त्यासाठी संविधानिक साक्षरतेची चळवळ उभी राहणे आवश्यक आहे.

डॉ. चलवादी यांच्या उपक्रमाचे महत्त्व याच ठिकाणी अधोरेखित होते. विशेषतः विद्यार्थ्यांच्या हातात संविधान देण्यामागे त्यांचा दूरगामी दृष्टिकोन आहे. आजचा विद्यार्थी उद्याचा डॉक्टर, अभियंता, वकील, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी किंवा लोकप्रतिनिधी आहे. त्याच्या शैक्षणिक जडणघडणीसोबत संविधानिक जडणघडणही झाली पाहिजे. त्याला केवळ करिअर घडविण्याचे शिक्षण मिळून उपयोग नाही. त्याच्यात विवेक, सामाजिक बांधिलकी, समतेची जाणीव आणि लोकशाहीविषयी आदर निर्माण झाला पाहिजे.

शिक्षण म्हणजे केवळ माहिती मिळविणे नाही. शिक्षण माणसाला प्रश्न विचारण्याची क्षमता देते. अन्याय ओळखण्याची दृष्टी देते. स्वतःच्या हक्कांसाठी उभे राहण्याचे बळ देते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला सामाजिक मुक्तीचे साधन मानले. त्यामुळे विद्यार्थ्यांपर्यंत संविधान पोहोचविणे म्हणजे बाबासाहेबांच्या शैक्षणिक आणि परिवर्तनवादी विचारांचा वारसा पुढे नेणे होय.

या उपक्रमाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे शासकीय अधिकाऱ्यांपर्यंत संविधान पोहोचविणे. प्रशासन हे संविधानाच्या अंमलबजावणीचे महत्त्वाचे माध्यम आहे. शासनाच्या योजना आणि धोरणे राबविताना सामाजिक न्याय, समान संधी आणि नागरिकांच्या प्रतिष्ठेचे भान असणे आवश्यक आहे. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या प्रत्येक घटकाला संविधानिक मूल्यांची जाणीव असणे गरजेचे आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांना संविधानाची प्रत भेट देणे हा केवळ औपचारिक सन्मान नसून घटनात्मक जबाबदारीची आठवण करून देणारा उपक्रम आहे.

आज समाजमाध्यमांमुळे माहितीचा प्रसार वेगाने होतो. मात्र, माहिती आणि ज्ञान यांमध्ये फरक असतो. एखाद्या विषयाविषयी काही ओळी वाचणे म्हणजे त्याचे आकलन होणे नव्हे. संविधानासारख्या व्यापक विषयाचे नियमित वाचन, चिंतन आणि चर्चा आवश्यक आहे. प्रत्येक कुटुंबात संविधानाची प्रत असावी. पालकांनी मुलांसोबत संविधान वाचावे. घरात अधिकार आणि कर्तव्यांवर चर्चा व्हावी. जातीय भेदभाव, स्त्री-पुरुष असमानता आणि सामाजिक अन्याय यांसारख्या प्रश्नांकडे संविधानिक दृष्टिकोनातून पाहिले जावे. तेव्हाच संविधान घराघरांत पोहोचल्याचे सार्थक होईल.

माझ्या दृष्टीने डॉ.चलवादी यांच्या या कार्याचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यातील सातत्य आणि निःस्वार्थ भावना. दोन हजारांहून अधिक संविधानाच्या प्रतींचे वाटप हा निश्चितच कौतुकास्पद टप्पा आहे. पण या कार्याचे खरे मोजमाप प्रतींच्या संख्येवर होणार नाही. किती जणांनी त्या वाचल्या? किती घरांमध्ये संविधानावर चर्चा सुरू झाली? किती विद्यार्थ्यांना आपल्या अधिकारांची जाणीव झाली? किती जणांनी सामाजिक समतेचा विचार आपल्या वर्तनात आणला? या प्रश्नांच्या उत्तरांत या उपक्रमाचे खरे यश दडलेले आहे.

संविधान दिनाच्या निमित्ताने आपण संविधानाला अभिवादन करतो. शासकीय कार्यालये, शाळा आणि महाविद्यालयांमध्ये कार्यक्रम आयोजित करतो. उद्देशिकेचे सामूहिक वाचन करतो. हे सर्व आवश्यक आहे. पण २६ नोव्हेंबर संपल्यानंतर संविधानाचे स्मरणही संपता कामा नये. संविधान ही एका दिवसाची बाब नाही. तो आपल्या जगण्याचा, विचारांचा आणि सामाजिक व्यवहाराचा आधार असला पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेले संविधान पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे ही केवळ शासनाची जबाबदारी नाही. ती समाजातील प्रत्येक सुजाण नागरिकाची जबाबदारी आहे. प्रत्येकाने आपल्या परीने संविधानिक साक्षरतेसाठी योगदान दिले पाहिजे. एखाद्या विद्यार्थ्याला संविधानाची प्रत भेट देणे, कुटुंबात त्याचे वाचन सुरू करणे किंवा सार्वजनिक ठिकाणी संविधानाच्या मूल्यांवर चर्चा घडविणे, हीदेखील परिवर्तनाची महत्त्वाची पावले आहेत.

डॉ. हुलगेश चलवादी यांचा उपक्रम याच परिवर्तनवादी विचारातून उभा राहिला आहे. त्यांच्या हातून दिली जाणारी संविधानाची प्रत्येक प्रत म्हणजे एका नव्या विचाराची पेरणी आहे. त्या विचारातून जागरूक नागरिक घडतील. समतेची जाणीव वाढेल. लोकशाही अधिक सक्षम होईल, अशी अपेक्षा आहे.

कारण संविधानाची प्रत घरात असणे ही पहिली पायरी आहे. तिचे वाचन करणे ही दुसरी. तिचा अर्थ समजून घेणे ही तिसरी. आणि तिच्यातील मूल्ये प्रत्यक्ष जीवनात आचरणात आणणे, हेच खरे संविधानिक परिवर्तन आहे!

संविधान केवळ पुस्तकात राहू नये; ते प्रत्येकाच्या विचारांत, व्यवहारात आणि जगण्यात उतरावे. हीच संविधान दिनाची खरी प्रेरणा आणि बाबासाहेबांना अभिवादन करण्याची सर्वांत अर्थपूर्ण पद्धत आहे.

ॲड.रेणुका चलवादी-शिर्के
सामाजिक कार्यकर्त्या तथा उपाध्यक्षा,
चलवादी शिक्षण संस्था,पुणे

गुरुनानकांचे विचार : मानवतेचा प्रकाश आणि समतेचा महामंत्र!

मानवाच्या इतिहासात काही महापुरुष असे होऊन गेले, ज्यांनी केवळ धर्माची शिकवण दिली नाही, तर माणसाला माणूस म्हणून जगण्याचा मार्ग दाखविला. त्यांनी समाजाला कर्मकांडाच्या अंधारातून बाहेर काढून सत्य, प्रेम, समता आणि बंधुभावाचा प्रकाश दिला. शीख धर्माचे संस्थापक आणि महान संत गुरुनानक देव हे अशाच युगप्रवर्तक महापुरुषांपैकी एक होत. त्यांच्या जयंतीनिमित्त म्हणजेच गुरुपर्वाच्या पवित्र पर्वावर त्यांच्या विचारांचे स्मरण करणे म्हणजे केवळ एका धर्मगुरूला अभिवादन करणे नव्हे, तर माणुसकीच्या मूल्यांशी पुन्हा एकदा नाते जोडणे होय. आज जगात धर्म, जात, भाषा, वंश आणि राजकीय विचारांच्या नावावर माणसांमध्ये दुरावा निर्माण होत असताना गुरुनानकांचे विचार अधिकच प्रासंगिक ठरतात. गुरुनानक देव यांचा जन्म १५ एप्रिल १४६९ रोजी पंजाबमधील तलवंडी येथे झाला. हे ठिकाण आज पाकिस्तानमध्ये असून ननकाना साहिब म्हणून प्रसिद्ध आहे. लहानपणापासूनच त्यांच्यात चिंतनशील वृत्ती, करुणा आणि अन्यायाविरुद्ध प्रश्न विचारण्याचे धाडस होते. समाजात धर्माच्या नावाखाली चालणारे भेदभाव, कर्मकांड, जातिभेद आणि सामाजिक विषमता पाहून त्यांचे मन अस्वस्थ होत असे. धर्म म्हणजे केवळ बाह्य आचार-विचार, पोशाख किंवा धार्मिक विधी नसून तो माणसाच्या आचरणातून प्रकट झाला पाहिजे, अशी त्यांची ठाम भूमिका होती. त्यांनी अध्यात्माला मानवतेची जोड दिली आणि धर्माला माणसाच्या कल्याणाचे साधन बनविले.

गुरुनानकांच्या तत्त्वज्ञानाचा पाया तीन मूलभूत शिकवणींवर आधारलेला आहे 'नाम जपो, किरत करो आणि वंड छको.' म्हणजेच ईश्वराचे स्मरण करा, प्रामाणिक कष्ट करून उपजीविका कमवा आणि आपल्या कमाईतील काही भाग गरजूंशी वाटून घ्या. या तीन शिकवणींमध्ये संपूर्ण जीवनाचे तत्त्वज्ञान सामावलेले आहे. ईश्वराचे स्मरण म्हणजे केवळ प्रार्थना नव्हे, तर आपल्या आचरणात सत्य, प्रेम आणि सद्भावना जपणे होय. प्रामाणिक श्रम म्हणजे कोणाचे शोषण न करता स्वाभिमानाने जगणे. तर वंड छको म्हणजे समाजातील वंचित, गरजू आणि दुर्बल घटकांबरोबर आपल्या सुख-दुःखाची वाटणी करणे. आजच्या स्वार्थप्रधान आणि स्पर्धेच्या जगात या शिकवणींचे महत्त्व अधिकच वाढले आहे. गुरुनानकांनी मांडलेली 'एक ओंकार' ही संकल्पना विश्वातील एकत्वाचा संदेश देते. परमेश्वर एक आहे आणि सर्व मानव त्याचीच निर्मिती आहेत, तर मग माणसामाणसांत उच्च-नीचतेची भिंत कशासाठी? जात कोणती, धर्म कोणता, भाषा कोणती किंवा जन्म कुठे झाला, यावर माणसाचे श्रेष्ठत्व ठरत नाही. माणसाची ओळख त्याच्या विचारांनी, कृतीने आणि माणुसकीने ठरते. ही भूमिका त्या काळातील सामाजिक विषमतेला दिलेले निर्भीड आव्हान होते. गुरुनानकांनी स्त्री-पुरुष समानतेचाही पुरस्कार केला. स्त्रीला कमी लेखणाऱ्या मानसिकतेवर त्यांनी प्रश्न उपस्थित केला. स्त्रीशिवाय मानवजातीच्या अस्तित्वाची कल्पनाही अशक्य असताना तिचा अपमान आणि अवहेलना कशी काय योग्य ठरू शकते, हा त्यांचा विचार आजही समाजाला अंतर्मुख करणारा आहे.

गुरुनानकांच्या विचारांचे सर्वाधिक सुंदर आणि जिवंत प्रतीक म्हणजे 'लंगर' ही परंपरा. गुरुद्वारामध्ये जात, धर्म, पंथ, श्रीमंती किंवा गरिबी असा कोणताही भेद न करता सर्वजण एकाच पंक्तीत बसून भोजन करतात. ही केवळ अन्नदानाची व्यवस्था नाही, तर सामाजिक समतेची प्रत्यक्ष कृती आहे. ज्या समाजात काहींना स्पर्श करण्यासही मनाई होती, त्या समाजात सर्वांनी एकत्र बसून भोजन करावे, ही क्रांतिकारी सामाजिक भूमिका होती. समता ही केवळ भाषणात किंवा पुस्तकात नसावी, तर ती प्रत्यक्ष व्यवहारात उतरली पाहिजे, हा संदेश लंगर देतो. भुकेल्या माणसाला धर्म विचारण्याऐवजी त्याला अन्न देणे, हाच खऱ्या धर्माचा अर्थ आहे. आज समाजात वाढणारी आर्थिक विषमता आणि सामाजिक दरी लक्षात घेता लंगरची परंपरा मानवतेचा सर्वोत्तम आदर्श ठरते. गुरुनानकांनी धार्मिक कट्टरतेला आणि अंधानुकरणाला विरोध केला. त्यांनी माणसाला विवेकाने विचार करण्याची शिकवण दिली. धर्माच्या नावाखाली जर माणसामाणसांत द्वेष निर्माण होत असेल, अन्यायाचे समर्थन होत असेल किंवा दुर्बलांचे शोषण केले जात असेल, तर अशा प्रवृत्तींचा पुनर्विचार झाला पाहिजे. धार्मिकता ही माणसाला जोडणारी असावी, तोडणारी नव्हे. पूजा, प्रार्थना आणि धार्मिक विधी यांपेक्षा सत्यनिष्ठ आचरण, प्रामाणिक श्रम, दया आणि परोपकार यांना अधिक महत्त्व आहे, असा त्यांचा संदेश होता. त्यांनी आपल्या उदासींच्या माध्यमातून विविध प्रदेशांत प्रवास करून लोकांशी संवाद साधला. विविध धर्मांच्या संतांशी विचारविनिमय केला आणि मानवतेचा समान धागा अधोरेखित केला.

आजच्या काळात गुरुनानकांचे विचार केवळ धार्मिक व्यासपीठांवर सांगून उपयोगाचे नाहीत, ते सामाजिक आणि सार्वजनिक जीवनात उतरविण्याची खरी गरज आहे. धर्माच्या नावावर द्वेष पसरविणे, जातीय तेढ निर्माण करणे, स्त्रियांचा अपमान करणे, गरीब आणि वंचितांचे शोषण करणे, भ्रष्टाचाराला प्रोत्साहन देणे आणि माणसामाणसांत भिंती उभारणे या प्रवृत्ती गुरुनानकांच्या शिकवणीच्या पूर्णपणे विरोधात आहेत. सोशल मीडियावर धार्मिक अस्मितेच्या नावाखाली अपमानास्पद भाषा वापरणारे आणि समाजात वैमनस्य पसरविणारे लोक जर गुरुनानकांच्या नावाने उत्सव साजरा करत असतील, तर त्यांनी प्रथम त्यांच्या विचारांचे आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. गुरुपर्व साजरा करण्याचा खरा अर्थ मिरवणुका, सजावट आणि औपचारिक शुभेच्छांपुरता मर्यादित नाही; तर आपल्या वर्तनातून समता, सेवा आणि बंधुभाव प्रस्थापित करणे हा आहे. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा, स्वातंत्र्याचा, न्यायाचा आणि बंधुतेचा अधिकार व मूल्याधार दिला आहे. गुरुनानकांनी शतकांपूर्वी मांडलेली मानवतेची शिकवण आणि संविधानाने स्वीकारलेली सामाजिक मूल्ये यांच्यात मानवी प्रतिष्ठेचा समान धागा दिसतो. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि गुरुनानक यांसारख्या महापुरुषांच्या विचारांचा केंद्रबिंदू सामाजिक न्याय, समता आणि माणसाचे स्वातंत्र्य हाच आहे. समाजातील शेवटच्या घटकाला सन्मानाने जगण्याची संधी मिळाली पाहिजे, हीच खरी लोकशाही आणि खरी मानवता आहे.

गुरुनानक जयंती म्हणजे प्रकाशाचा, विवेकाचा आणि माणुसकीचा उत्सव. त्यांच्या विचारांचा स्वीकार केवळ एका समाजाने किंवा धर्माने करावा असे नाही, तर प्रत्येक भारतीयाने करावा. कारण मानवतेला धर्माची सीमा नसते आणि सेवेला जात-पंथाचा अडसर नसतो. भुकेल्याला अन्न, दुःखिताला आधार, अन्यायग्रस्ताला न्याय आणि प्रत्येक माणसाला सन्मान देणे हीच गुरुनानकांना खरी आदरांजली ठरेल. आज गरज गुरुनानकांच्या नावाचा जयघोष करण्यापेक्षा त्यांच्या विचारांचा जागर करण्याची आहे. धर्माच्या भिंती उंचावण्यापेक्षा माणुसकीचे पूल बांधण्याची आहे. कारण माणूस मोठा होतो तो त्याच्या धर्माच्या घोषणांनी नव्हे, तर त्याच्या कर्माने, करुणेने आणि इतरांच्या दुःखात सहभागी होण्याच्या वृत्तीने! गुरुनानकांचा मानवतेचा संदेश प्रत्येकाच्या मनात रुजला, तर समाजातील द्वेषाचे अंधार दूर होऊन समता, बंधुता आणि शांततेचा नवा प्रकाश निश्चितच निर्माण होईल. गुरुनानक देव यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

प्रवीण बागडे
साहित्यिक व सामाजिक विश्लेषक
नागपुर (मो. ९९२३६२०९१९)

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर
बुधवार, दि. २५ नोव्हेंबर २०२६

उरणमध्ये 40 वर्षांनंतरही इंजिनिअरिंग कॉलेज नाही; उरणकरांच्या उदासीनतेवर प्रा. एल. बी. पाटील यांचा सवाल!

जमिनी दिल्या, आर्थिक सुबत्ता आली; मात्र स्थानिक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आजही मुंबई-पुण्याची वाट धरावी लागते

इंजिनिअरिंग कॉलेजसाठी जमा झालेल्या १० ते १२ कोटींच्या निधीचे नेमके काय झाले? सत्य जनतेसमोर आणण्याची मागणी

उरण दि. २४ (विठ्ठल ममताबादे) : देशाच्या औद्योगिक आणि बंदर विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या उरण तालुक्यात आजही इंजिनिअरिंग कॉलेज नसणे, ही अत्यंत खेदजनक आणि चिंताजनक बाब आहे. १९८४ पासून तब्बल चार दशके उलटून गेली, अनेक राजकीय सत्तांतरे झाली, लोकप्रतिनिधी बदलले, विकासाची अनेक आश्वासने दिली गेली; मात्र उरणमधील विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकी महाविद्यालय उभारण्याचा प्रश्न अद्याप मार्गी लागलेला नाही. या गंभीर प्रश्नाबाबत उरणकरांना खंत का वाटत नाही? समाजातील लोकप्रतिनिधी, राजकारणी, धनिक आणि सुशिक्षित नागरिक यांची या प्रश्नाबाबतची उदासीनता कधी संपणार? असा परखड सवाल साहित्यरत्न रायगडभूषण प्रा. एल. बी. पाटील यांनी उपस्थित केला आहे.

१९८४ नंतर उरण तालुक्यातील अनेक नागरिकांनी जेएनपीटी (आताचे जेएनपीए) प्रकल्पासाठी स्थानिक शेतकऱ्यांनी जमिनी दिल्या. या भूसंपादनामुळे अनेक कुटुंबांच्या आर्थिक परिस्थितीत बदल झाला. घराघरांत आर्थिक सुबत्ता निर्माण झाली. मुला-मुलींना उच्च शिक्षण देण्याची स्वप्ने पालक पाहू लागले. मात्र, उरणमध्ये इंजिनिअरिंग कॉलेज आणि मेडिकल कॉलेज नसल्याने या स्वप्नांच्या पूर्ततेसमोर मोठे आव्हान उभे राहिले. आर्थिक परिस्थिती चांगली असूनही मुलांना उच्च शिक्षणासाठी मुंबई, ठाणे आणि पुणे यांसारख्या शहरांमध्ये पाठविण्याशिवाय पालकांकडे पर्याय राहिला नाही. प्रवास, निवास आणि शिक्षणाचा वाढता खर्च यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर मर्यादा आल्या, तर काहींची उच्च शिक्षणाची स्वप्ने अपूर्ण राहिली.

१९८४ नंतरची दोन ते अडीच दशके उलटून गेल्यानंतरही या प्रश्नावर ठोस उपाययोजना झाली नाही. २००८-०९ च्या सुमारास उरणमध्ये इंजिनिअरिंग कॉलेज सुरू करण्यासाठी काही व्यक्तींनी पुढाकार घेतल्याची चर्चा सुरू झाली. त्यामुळे उरणकरांच्या मनात आशेचे वातावरण निर्माण झाले. या प्रकल्पासाठी १० ते १२ कोटी रुपये जमा करण्यात आल्याचीही चर्चा त्यावेळी ऐकायला मिळाली. मात्र, प्रत्यक्षात इंजिनिअरिंग कॉलेज कुठे उभे राहिले? किती निधी जमा झाला? निधी कोणाकडे जमा करण्यात आला? जमा झालेल्या पैशांचा विनियोग कशासाठी झाला? प्रकल्प रखडण्यामागील नेमकी कारणे कोणती? असे अनेक प्रश्न आजही अनुत्तरित आहेत.



या निधीबाबत कोणावरही आरोप करण्याचा उद्देश नसून, या संपूर्ण प्रकरणातील वस्तुस्थिती पारदर्शकपणे जनतेसमोर यावी, एवढीच अपेक्षा आहे. संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी या प्रकल्पाबाबतची अधिकृत माहिती, निधीचा तपशील आणि आजपर्यंत झालेल्या कामाची माहिती सार्वजनिक करणे आवश्यक आहे. कारण हा प्रश्न कोणत्याही एका व्यक्तीचा किंवा संस्थेचा नसून संपूर्ण उरण तालुक्यातील भावी पिढीच्या शैक्षणिक भवितव्याचा आहे.

आज २०२६ साल उजाडले, तरी उरण तालुक्यात इंजिनिअरिंग कॉलेज नाही. यासाठी केवळ राजकीय पुढाऱ्यांना, आमदार-खासदारांना किंवा धनिकांना दोष देऊन चालणार नाही. समाजातील प्रत्येक सुशिक्षित नागरिकानेही या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. उरणच्या विकासाच्या गप्पा मारणारे आपण शिक्षणासारख्या मूलभूत आणि महत्त्वपूर्ण विषयावर इतकी वर्षे गप्प का राहिलो? आपल्या पुढच्या पिढीच्या भविष्याचा विचार करण्याची जबाबदारी आपली नाही का? असा आत्मपरीक्षण करायला लावणारा सवाल प्रा. पाटील यांनी उपस्थित केला आहे.

उरण तालुक्यात १०० ते २०० कोटी रुपये खर्च करून शैक्षणिक संस्था उभारण्याची आर्थिक क्षमता असलेले उद्योजक, धनिक आणि दानशूर व्यक्ती नाहीत असे नाही. अनेकांनी यापूर्वी प्रयत्न केल्याचेही सांगितले जाते. मात्र, हे प्रयत्न प्रत्यक्षात यशस्वी का झाले नाहीत, याचा शोध घेणे आवश्यक आहे. उद्योगधंदे, बंदरे आणि मोठमोठे प्रकल्प असलेल्या उरण तालुक्यात विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध नसणे, ही निश्चितच आत्मपरीक्षण करण्याची बाब आहे.

आता तरी उरणकरांनी जागे होण्याची वेळ आली आहे!

उरण तालुक्यात इंजिनिअरिंग कॉलेज उभारण्यासाठी आजवर कोणी काय प्रयत्न केले, कोणत्या अडचणी आल्या, निधी संकलन झाले असल्यास त्याचे काय झाले आणि भविष्यात कॉलेज उभारण्यासाठी कोणती ठोस पावले उचलली जाणार आहेत, याची उत्तरे जनतेला मिळाली पाहिजेत. राजकीय पक्ष, लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्था, उद्योजक आणि सुशिक्षित नागरिकांनी पक्षीय मतभेद बाजूला ठेवून या प्रश्नावर एकत्र येण्याची गरज आहे.

१९८४ ते २०२६ या चार दशकांच्या कालावधीत उरणच्या किती विद्यार्थ्यांना स्थानिक पातळीवर उच्च शिक्षणाची संधी मिळू शकली असती? किती विद्यार्थ्यांना आर्थिक आणि भौगोलिक अडचणींमुळे आपल्या शिक्षणाच्या स्वप्नांवर पाणी सोडावे लागले? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची वेळ आली आहे.

उरणच्या जमिनी प्रकल्पांसाठी गेल्या, उरणकरांनी विकासासाठी त्याग केला; मग उरणच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सुविधा मिळणार तरी कधी? हा प्रश्न आता प्रत्येक उरणकराने विचारला पाहिजे. उरणच्या पुढील पिढीच्या भवितव्यासाठी इंजिनिअरिंग कॉलेजची मागणी ही केवळ अपेक्षा नसून काळाची गरज आहे. या प्रश्नाचे सत्य शोधल्याशिवाय आणि त्यावर ठोस निर्णय झाल्याशिवाय स्वस्थ बसता कामा नये, असे मत साहित्यरत्न रायगडभूषण प्रा. एल. बी. पाटील यांनी व्यक्त केले आहे.

इंदापूर येथे 26 नोव्हेंबर रोजी 77 वा संविधान दिन आणि TBSST चा चौथा वर्धापन दिनाचे आयोजन

बोरघर, माणगाव, जि. रायगड - त्रिरत्न बहुजन सेवा संघ तळाशेत (TBSST) आयोजित 77 वा भारतीय संविधान दिन आणि तबरस्सतचा 4 था वर्धापन दिन सोहळा गुरूवार, दिनांक 26 नोव्हेंबर 2026 रोजी मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे.

'जागर संविधानाचा - माझे संविधान, माझा अभिमान!'* या घोषवाक्यासह होणाऱ्या या कार्यक्रमाचे आयोजन TBSST चे पदाधिकारी आणि सदस्य यांनी केले आहे. या सोहळ्याच्या निमंत्रण पत्रिकेवर 'संविधान हे फक्त वकिलांनी आणि कोर्टातल्या लोकांनी वाचायचं पुस्तक नाही; ते प्रत्येक ग्रामपंचायतीने आणि सामान्य नागरिकाने समजून घ्यायचं पुस्तक आहे' हा प्रेरणादायी संदेश देण्यात आला आहे.

कार्यक्रमाची ठळक वैशिष्ट्ये:

१. स्थळ, वेळ आणि सादरीकरण:

- ***दिनांक:*** गुरूवार, 26 नोव्हेंबर 2026
- ***वेळ:*** सायं. 5.30 वा. ते रात्री 10.00 वा. पर्यंत
- ***स्थळ:*** डॉ. आदेश घोणे यांच्या मल्टिस्पेशालिटी क्लिनिकच्या समोर, तळाशेत - तळा रोड, मु. पो. तळाशेत (इंदापूर), ता. माणगाव, जि. रायगड,
- ***सांस्कृतिक सादरीकरण:*** सामुहिक गीत गायन - गीत मंच ग्रुप इंदापूर (लहान गट) सादर करणार आहे.

२. प्रमुख मार्गदर्शक वक्ता:

मा. भास्करराव पेरे पाटील - राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त 'आदर्श गाव पाटोदा' चे शिल्पकार तथा 'यशदा' (यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, महाराष्ट्र शासन) चे सुप्रसिद्ध ग्रामविकास व्याख्याते.

नरसापुर नगरसोल रेल्वे मध्ये धाडसी चोरी. पाच लाखाचा मुद्देमाल घेऊन चोरट्याने केला पोबारा

हिंदू प्रकाश वार्ता /अशोक पवार

परभणी**नरसापुर नगरसोल एक्सप्रेस ने प्रवास करत असताना एका प्रवाशा जवळील 480, 500रुपये किमतीचे दागिने व इतर वस्तू लंपास करण्यात आले आहेत सदर घटना 21 नोव्हेंबर पहाटे सुमारास परभणी स्थानकावरून रेल्वे सुटल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला या प्रकरणात अज्ञात वर लोहमार्ग पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून लोहमार्ग पोलीस अधिक तपास करीत आहेत.

नारायण गुरुवर्य कुठला यांनी तक्रार दिली आहे फिर्यादी ह्या नरसापुर नगरसोल एक्सप्रेस ने प्रवास करत होत्या चोरट्याने त्यांच्या जवळील पर्स लंपास केली सदर पर्समध्ये 85 हजार रुपये किमतीचे सोन्याची साखळी व चार लाख रुपये किमतीचे सोन्याचे मंगळसूत्र आणि रोग दीड हजार होते परभणी रेल्वे स्थानकावरून गाडी सुटल्यानंतर चोरी झाल्याचे लक्षात आले या प्रकरणी लोहमार्ग पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून दरम्यान मागील काही दिवसात रेल्वे प्रवासामध्ये चोरीच्या अनेक घटना घडल्या आहेत. तरीही लोहमार्ग पोलिस वाला जाग येत नाही प्रवाशांचा सुरक्षितता प्रश्न निर्माण झाला असून प्रवाशांनी कसा प्रवास करावा व यामधून कशी सुरक्षितता निर्माण होईल याकडे प्रवाशांनीचिंता व्यक्त केल्या पोलिसांनी रेल्वेतील ग्रस्त वाढवावी चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी प्रवासी बांधवातून होत आहे

अहिल्यानगरमध्ये दोन घरफोड्या उघड 3.80 लाखांचे सोन्याचे दागिने जप्त



अहिल्यानगर : तोफखाना पोलीस ठाण्याच्या हद्दीत झालेल्या दोन घरफोड्यांचे गुन्हे उघडकीस आणण्यात पोलिसांना यश आले आहे. या प्रकरणातील आरोपी अजय महावीर भुक्तर (रा. हिंगोली) याला अटक करण्यात आली असून, त्याच्याकडून सुमारे ३ लाख ८० हजार ५०० रुपये किमतीचे चार तोळे वजनाचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

बायजाबाई सोसायटी, पाइपलाइन रोड येथील बाळासाहेब पवार यांच्या घराचे कुलूप तोडून सोन्याचे दागिने व रोख रकमेसह १ लाख ५७ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेला होता. तसेच त्यांच्या घरामागे राहणारे अमोल झेंडे यांच्या घरातून १ लाख ८२ हजार रुपयांचा ऐवज चोरीला गेला होता. या दोन्ही गुन्ह्यांत एकूण ३ लाख २९ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेला होता. याशिवाय राजश्री रसाळ यांच्या घरफोडीचाही तपास सुरू होता.

दरम्यान, छत्रपती संभाजीनगर येथील जवाहरनगर पोलीस ठाण्यात घरफोडीच्या गुन्ह्यात अटक असलेल्या अजय भुक्तर याने या गुन्ह्यांची कबुली दिल्यानंतर त्याला ट्रान्सफर वॉरंटद्वारे अहिल्यानगर पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून सोन्याच्या तीन लगडी हस्तगत करण्यात आल्या.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे व उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पो. नि. बालाजी वैद्य, स. पो. नि. कल्पना चव्हाण व तोफखाना पोलीस ठाण्याच्या पथकाने ही कारवाई केली.

रेशीम शेतीतील आधुनिक तंत्रज्ञान आणि यांत्रिकीकरणावर शेतकऱ्यांना मार्गदर्शन

सिल्क समग्र-2 योजनेंतर्गत शेतकऱ्यांचे पाच दिवसीय प्रशिक्षण; तुती लागवडीचे प्रात्यक्षिक

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी: केंद्र शासनाच्या सिल्क समग्र-२ योजनेंतर्गत रेशीम कार्यालय, परभणी यांच्या वतीने ५० रेशीम उत्पादक शेतकऱ्यांसाठी आयोजित पाच दिवसीय निवासी प्रशिक्षण कार्यक्रमाला २३ नोव्हेंबरपासून सुरुवात झाली आहे. हे प्रशिक्षण २७ नोव्हेंबरपर्यंत चालणार असून, त्यानंतर शेतकऱ्यांसाठी जालना व अहिल्यानगर जिल्ह्यांचा दोन दिवसीय अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला आहे.

प्रशिक्षणाच्या दुसऱ्या दिवशी शेतकऱ्यांना तुती लागवड तंत्रज्ञान, रेशीम शेतीतील आधुनिक पद्धती आणि यांत्रिकीकरणाचे महत्त्व याविषयी तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे शेतीकामात येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी यांत्रिकीकरणाची आवश्यकता, तुती रोपवाटिका लागवडीचे महत्त्व व फायदे, तुतीच्या विविध जाती तसेच तुती पिकावरील रोग व कीड नियंत्रण या विषयांची सविस्तर माहिती देण्यात आली.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील प्राध्यापक डॉ. चंद्रकांत लटपटे, प्रा. धनंजय मोहोड, डॉ. अश्विनी गावंडे तसेच केंद्रीय रेशीम मंडळाचे शास्त्रज्ञ श्री. अशोक जाधव यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.



दुपारच्या सत्रात वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील रेशीम संशोधन तथा प्रशिक्षण केंद्र येथे तुती लागवड व रोपवाटिका व्यवस्थापनाबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये तुतीच्या विविध जातींची ओळख, पिकावरील रोग व कीड नियंत्रण, रोपवाटिकेचे नियोजन, वाफे तयार करण्याची पद्धत, दोन रोपांमधील अंतर, पाणी व्यवस्थापन आदी बाबींची माहिती देण्यात आली.

तसेच तुती लागवडीच्या विविध पद्धती आणि प्रत्येक पद्धतीसाठी उपयुक्त असलेली यांत्रिक अवजारे यांचे प्रात्यक्षिकाद्वारे सादरीकरण करण्यात आले.

सहाय्यक प्राध्यापक धनंजय मोहोड, प्रा. डॉ. अश्विनी गावंडे आणि केंद्रीय रेशीम मंडळाचे शास्त्रज्ञ श्री. अशोक जाधव यांनी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिके दाखवून मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणामुळे रेशीम उत्पादक शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित तुती लागवड पद्धती, रोग व कीड नियंत्रण तसेच यांत्रिकीकरणाबाबत व्यावहारिक ज्ञान मिळण्यास मदत होत आहे.

प्रशिक्षणाच्या आयोजनासाठी रेशीम कार्यालयाच्या वतीने सागर मिसाळ, गजानन काचगुंडे, श्री. वगदकर, श्री. जोगदंड, मुंडे, भालेराव तसेच श्रीमती तालडे यांनी सहकार्य केले.

आर.पी. हॉस्पिटल मध्ये जन्मजात हृदयात छिद्र असलेल्या मुलीला जीवदान

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**मानवत येथील एका 15. वर्षीय मुलीच्या हृदयातील जन्म जात असलेल्या छिद्रावर परभणी येथील आमदार. डॉ. राहुल पाटील यांच्या आर.पी. हॉस्पिटलमध्ये अत्यंत गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत पूर्णपणे निशुल्क झालेल्या उपचारामुळे मुलीला नवजीवन मिळाले आहे. शस्त्रक्रियेनंतर मुलीची प्रकृती आता पूर्णपणे स्थिर असून तिच्या श्वसनाचा आणि थकव्याचा त्रास दूर झाला आहे.

या यशस्वी उपचारामुळे आर.पी. हॉस्पिटलच्या वैद्यकीय टीमने पुन्हा एकदा आरोग्य क्षेत्रात महत्त्वाची कामगिरी केली आहे. मानवत येथील ही मुलगी गेल्या 3 वर्षापासून दम लागणे सतत थकवा जाणवणे आणि उच्च व कमी रक्तदाबाच्या त्रासाने ग्रासली होती. तिच्या हृदयाची.2.डी-इको तपासणी केली असता तिच्या हृदयाला जन्म जात छिद्र असल्याचे समजले. तिला संधिवाताचा गंभीर आजार जडला होता या दुहेरी आजारामुळे तिला रात्री शांत झोप येत नव्हती. तसेच वयानुसार आवश्यक शारीरिक वाढ ही खूंटली होती. मुलीच्या उपचारांसाठी तिच्या कुटुंबीयांनी नामांकित रुग्णालयाचे उंबरठे झिजवले. मात्र गुंतागुंतीच्या प्रकृतीमुळे सर्वत्र उपचार नाकारले गेले. हताश झालेल्या कुटुंबीयांनी परभणीतील.आर.पी. हॉस्पिटलमध्ये धाव घेतली आणि रुग्णालय प्रशासनाने त्यांना मदतीचा हात पुढे केला.

आर.पी. हॉस्पिटलचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अनुभवी बाल हृदयरोगतज्ज्ञ. डॉ. नितीन येळीकर. हृदयरोग तज्ज्ञ. डॉ. दीपक कुबडे. यांच्या चमूने. कौशल्याने अचूकपणे हृदयातील छिद्र बंद करण्याची ही अवघड शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली. यात डॉ. सलाम तांबोळी. डॉ. शहाजी बोडखे. डॉ. संतोष हराळ. बालरोग तज्ज्ञ डॉ. बडे. डॉ. गिरी. डॉ. यांच्यासह परिचारिका व वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली.

यावेळी मुलीच्या आईने सांगितले की आमच्या मुलीच्या उपचारासाठी आम्ही मोठ्या शहरांत खूप फिरलो पण कोठेही यश आले नाही. तिला प्रचंड त्रास होत होता. रात्री झोपही लागत नव्हती आणि शारीरिक वाढ ही थांबली होती. आम्ही पूर्णपणे खचून गेलो होतो. मात्र.आर.पी. हॉस्पिटलने आमच्या मुलीवर मोफत शस्त्रक्रिया करून तिला नवीन जीवदान दिले असून आम्ही डॉक्टरांचे आणि रुग्णालय प्रशासनाचे जन्मभर ऋणी राहू असे सांगितले...

आर.पी. हॉस्पिटलचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद शिंदे यांनी सांगितले की सामान्य आणि गरजू रुग्णांना दर्जेदार व अत्याधुनिक वैद्यकीय सेवा परभणीत पूर्णपणे निशुल्क मिळावी हाच आमचा मुख्य उद्देश आहे. मोठ्या शहरांत शस्त्रक्रिया न झालेल्या या मुलीवर आमच्या डॉक्टरांच्या चमुने यशस्वी शस्त्रक्रिया करून तिला नवजीवन दिल्याचा मला सार्थ अभिमान आहे. भविष्यातही. आर.पी. हॉस्पिटलचा मदतीचा हात गरीब रुग्णांसाठी सदैव तत्पर राहील. असे मत व्यक्त केले.

सामान्य कार्यकर्त्यापासून राज्यसभेपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास; रामराव वडकुते साहेबांचे नेतृत्व सदैव स्मरणात राहील! – गणेशदादा हाके पाटील



महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील अभ्यासू, संयमी, अनुभवी आणि तळागाळातील सामान्य माणसाशी नाळ जोडलेले ज्येष्ठ नेतृत्व म्हणजे रामराव वडकुते साहेब. त्यांच्या निधनाची दुःखद बातमी मनाला सुन्न करणारी असून, एका समर्पित नेतृत्वाला महाराष्ट्र मुकला आहे.

रामराव वडकुते साहेब हे माझे अत्यंत जवळचे स्नेही होते. त्यांच्यासोबत काम करण्याची मला संधी मिळाली, हा माझ्या सार्वजनिक आणि राजकीय जीवनातील जिव्हाळ्याचा अनुभव आहे. पक्षाचे जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांनी संघटनात्मक बांधणीसाठी मोठे योगदान दिले. कार्यकर्त्यांशी असलेला त्यांचा स्नेह, माणसे जोडण्याची हातोटी आणि प्रत्येकाशी आपुलकीने संवाद साधण्याची त्यांची शैली नेहमीच प्रेरणादायी होती.

एका सामान्य कुटुंबातून आणि सामाजिक कार्याच्या प्रवासातून देशाच्या सर्वोच्च सभागृहापर्यंत, म्हणजेच राज्यसभेपर्यंत पोहोचलेला त्यांचा जीवनप्रवास अनेक कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी आहे. विशेषतः धनगर समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. शेळी-मेंढी महामंडळाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी आपली जबाबदारी समर्थपणे पार पाडली.

त्यांच्या राजकीय वाटचालीत पदापेक्षा समाजहिताला आणि संघटनात्मक कार्याला अधिक महत्त्व होते. सामान्य माणसांच्या प्रश्नांची जाण, समाजातील वंचित घटकांविषयीची आस्था आणि कार्यकर्त्यांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी ओळख होती.

रामराव वडकुते साहेबांचे व्यक्तिमत्त्व केवळ राजकीय नेतृत्वापुरते मर्यादित नव्हते, तर समाजातील सर्वसामान्य माणसाला आधार देणारे आणि कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देणारे होते. त्यांच्या सहवासातून अनेकांना काम करण्याची प्रेरणा मिळाली. त्यांच्यातील संयम, अभ्यासू वृत्ती आणि सामाजिक प्रश्नांची जाण या गुणांमुळे त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली होती.

आज ते आपल्यात नाहीत, ही वस्तुस्थिती मनाला स्वीकारणे कठीण आहे. मात्र, व्यक्ती काळाच्या पडद्याआड जाते; पण तिने समाजासाठी केलेले कार्य, निर्माण केलेली माणसे आणि दिलेले विचार कधीच संपत नाहीत. रामराव वडकुते साहेबांचे सामाजिक योगदान, संघटनात्मक कार्य आणि प्रेरणादायी जीवनप्रवास पुढील अनेक पिढ्यांना मार्गदर्शन करत राहील.

त्यांच्या निधनाने केवळ भारतीय जनता पार्टीचेच नव्हे, तर सामाजिक आणि राजकीय क्षेत्राचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न निघणारी आहे. या दुःखद प्रसंगी त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन करून मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि वडकुते कुटुंबीयांसह सर्व आप्तस्वकीयांना या दुःखातून सावरण्याचे बळ प्रदान करो, हीच प्रार्थना.

रामराव वडकुते साहेबांचे कार्य, विचार आणि आठवणी सदैव आमच्या स्मरणात राहतील. त्यांचे प्रेरणादायी जीवनकार्य हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल!

इंस्टाग्रामवर पिस्तुलसह रील टाकून दहशत माजवणारा अटकेत



हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी : इंस्टाग्रामवर पिस्तुलसह रील टाकून दहशत माजवणारा व दोन गंभीर गुन्ह्यांत पाहिजे असलेला आरोपी अटक, त्याच्याकडून छर्रे गन व 02 लायटर गन जप्त* आरोपी पोलिसांच्या जाळ्यात**

पोलीस स्टेशन कोतवाली येथे दाखल गु.र.नं. 557/2026 कलम 296, 352, 3(5) BNS सह 3(r)(s) ॲट्रॉसिटी कायदा व गु.र.नं. 557/2026 कलम 109, 118, 189, 296 BNS या गंभीर गुन्ह्यांमधील पाहिजे आरोपी नामे *उमर दिलदार खान, रा. क्रांतीनगर, परभणी* याचा शोध घेत असताना तो MK Tiles मालकीच्या दुकानात मिळून आल्याने त्यास ताब्यात घेण्यात आले.

सदर आरोपीस अधिक विचारपूस केली असता त्याने गुन्हा केल्याचे कबूल केले. तसेच त्याचा इंस्टाग्राम आयडी तपासला असता त्याने पिस्तुलसह दहशत निर्माण करणारे रील प्रसारित केल्याचे आढळून आले. त्यास सदर अग्निशस्त्रासारख्या वस्तूबाबत विचारणा केली असता त्याच्याकडून अग्निशस्त्रासारखी दिसणारी *एक छर्रे गन व 02 लायटर गन* मिळून आल्या. त्यामुळे सदर आरोपी विरुद्ध पोलीस स्टेशन कोतवाली येथे गु.र.नं. 560/2026 कलम 6, 28 आर्म्स ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर आरोपीस वर नमूद दोन गंभीर गुन्ह्यांत पाहिजे रिपोर्ट देऊन पोलीस स्टेशन कोतवाली येथे हजर करण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा श्री पंकज कुमावत IPS पोलीस अधीक्षक परभणी यांचे मार्गदर्शनाखाली श्री गजेंद्र सरोदे पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा परभणी यांचे नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेची टीमPSI चंदनसिंह परिहार, PSI गणेश सवंडकर, GPSI मधुकर चट्टे, पोलीस अंमलदार ASI सुग्रीव केंद्रे,निलेश भुजबळ, HC नेताजी गीते

पुढील तपास पोलीस स्टेशन कोतवाली करीत आहे.

राष्ट्रीय लघुचित्रपट स्पर्धेच्या अंतिम फेरीत चिरनेरच्या 'कर्जाची छाया'ची दमदार धडक!

उरण दि. २४ : कलाकारांची खाण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या उरण तालुक्यातील चिरनेर गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. चिरनेरचे सुपुत्र पृथ्वीराज कडू यांनी दिग्दर्शित केलेल्या आणि पृथ्वीराज कडू फिल्म्स निर्मित 'कर्जाची छाया' या लघुचित्रपटाची अखिल भारतीय प्रहार चित्रपट संघटना आयोजित 'शिवप्रहार राष्ट्रीय लघुचित्रपट महोत्सव २०२६' अंतर्गत माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे लघुचित्रपट स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी निवड झाली आहे. देशभरातून आलेल्या २०० हून अधिक लघुचित्रपटांमधून या चित्रपटाने अंतिम फेरीपर्यंत मजल मारल्याने चिरनेरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. विशेष म्हणजे, अत्यंत कमी कालावधीत या लघुचित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. चित्रपटाचे लेखन अवघ्या एका दिवसात करण्यात आले, तर दोन दिवसांत चित्रीकरण आणि पुढील दोन दिवसांत संकलनाचे काम पूर्ण करण्यात आले. कमी वेळेत उत्कृष्ट नियोजन, सांघिक मेहनत आणि कलात्मक दृष्टिकोन यांच्या जोरावर या चित्रपटाने राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत आपले स्थान निर्माण केले आहे.



या लघुचित्रपटाचे दिग्दर्शन पृथ्वीराज कडू यांनी केले असून, लेखन सुभाष कडू यांनी केले आहे. चित्रीकरणासाठी कॅमेरा सोनिकचे प्रोप्रायटर सोनिक ठाकूर आणि सिनेमॅटिक सचिनचे प्रोप्रायटर सचिन म्हात्रे यांनी विशेष मेहनत घेतली. त्यांच्या तांत्रिक सहकार्यामुळे चित्रपटाला दर्जेदार स्वरूप प्राप्त झाले आहे. या चित्रपटात सुशील म्हात्रे, अक्षर कडू, सिद्धेश मोकल, ऋषिकेश कडू, सुभाष कडू, सुगंधा कडू आणि पृथ्वीराज कडू यांनी प्रमुख भूमिका साकारल्या आहेत. तसेच निर्मिती व तांत्रिक सहकार्यात सोनिक ठाकूर, सचिन म्हात्रे, पृथ्वीराज कडू, केवल मोकल, यश गाताडे , राज तांडेल , आदित्य म्हात्रे, करण कोंडिलकर, यश माळी आणि आर्यन पाटील यांचे योगदान लाभले आहे. या स्पर्धेची घोषणा २ ऑगस्ट रोजी आमदार बच्चू कडू आणि कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती. या स्पर्धेचे प्रमुख संदीप मोहिते-पाटील आहेत. या महोत्सवाचा अंतिम निकाल जानेवारी २०२७ मध्ये माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत जाहीर होणार आहे. उरण तालुक्यातील चिरनेरसारख्या ग्रामीण भागातील कलाकारांनी अत्यंत मर्यादित साधनसामग्रीतून राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेच्या अंतिम फेरीपर्यंत मजल मारणे ही निश्चितच अभिमानास्पद बाब आहे.

'कर्जाची छाया' या लघुचित्रपटाला अंतिम फेरीत यश मिळावे आणि चिरनेरच्या कलाकारांचा नावलौकिक राष्ट्रीय स्तरावर अधिक उज्ज्वल व्हावा, अशा शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

छत्रपती संभाजीनगर
बुधवार, दि. २५ नोव्हेंबर २०२६

दुष्काळ निवारणाच्या उपायोजनांना सर्वोच्च प्राधान्य द्या : पालक सचिव डॉ चंद्रकांत पुलकुंडवार





हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी, ** जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी प्रशासनातील सर्व विभागांनी समन्वयाने, नियोजनबद्ध आणि गतिमान पद्धतीने काम करावे. दुष्काळ निवारणाच्या कामांमध्ये कोणत्याही प्रकारची कुचराई किंवा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. दुष्काळग्रस्तांसाठी शासनाकडून जाहीर होणारा निधी कोणत्याही विलंबाशिवाय वेळेत लाभार्थ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे. शेतकरी आणि नागरिकांच्या समस्यांकडे दुर्लक्ष न करता त्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडवावेत, असे निर्देश परभणी जिल्ह्याचे पालक सचिव तथा ग्रामविकास व पंचायतराज विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात आज डॉ. पुलकुंडवार यांनी जिल्ह्यातील दुष्काळ परिस्थिती आणि विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.

बैठकीस जिल्हाधिकारी अण्णासाहेब चव्हाण, जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, जिल्हा परिषदेच्या प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर, प्र. अपर जिल्हाधिकारी शोभा जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, शैलेश लाहोटी, युवराज डापकर, संगीता चव्हाण जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अंकुश चव्हाण, श्री. घोणसीकर, सर्व तहसीलदार, गटविकास अधिकारी यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

डॉ. पुलकुंडवार यांनी बैठकीत प्राधान्याने जिल्ह्यातील दुष्काळ स्थिती, पाणीटंचाई, जलसंधारण, चारा उपलब्धता, शासकीय योजनांची अंमलबजावणी, जिल्हा वार्षिक योजना आणि विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला.

यावेळी सर्व विभागप्रमुखांना स्पष्ट सूचना देताना दुष्काळी परिस्थितीत नागरिकांना पाणी, जनावरांना चारा आणि इतर अत्यावश्यक सुविधांची कमतरता भासणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले.

जलतारा शोषखड्डे व जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य

दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी जलसंधारणाची कामे प्रभावीपणे करण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या एक एकर क्षेत्रात किमान एक जलतारा शोषखड्डा तयार करावा, यासाठी संबंधित विभागाने शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे. तसेच प्रत्येक घराच्या परिसरात रेन वॉटर हार्वेस्टिंग करण्यासाठी जनजागृती करावी. या माध्यमातून पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूजलपातळीत वाढ करण्यासाठी प्रयत्न करावेत.

जलतारा शोषखड्डे आणि चारा लागवडीसाठी व्हिबी-रामजी योजनेच्या निधीतून प्राधान्य द्यावे. संबंधित यंत्रणांनी या कामांची प्रभावी अंमलबजावणी करावी. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातूनही दुष्काळ निवारणाची आवश्यक कामे प्रस्तावित करून त्यांना तातडीने गती द्यावी, असे, त्यांनी सांगितले.

पाणीटंचाईवर नियंत्रण; पिण्याच्या पाण्याचे काटेकोर नियोजन करा

पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करून उपलब्ध पाणीसाठा पिण्यासाठी राखून ठेवावा. पिण्याचे पाणी अन्य कारणांसाठी वापरले जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. पाण्याची चोरी आणि अनधिकृत उपसा रोखण्यासाठी कडक कार्यवाई करावी. प्रकल्प, तलाव आणि बंधाऱ्यांना संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेटी देऊन पाहणी करावी. प्रकल्प, बंधाऱ्यांची आवश्यक दुरुस्ती तातडीने पूर्ण करावी.

गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियानांतर्गत ज्या प्रकल्पांमधील गाळ काढण्याची कामे अपूर्ण आहेत, ती प्राधान्याने पूर्ण करावीत. सर्व कामे गुणवत्तापूर्ण झाली पाहिजेत.

चारा उपलब्धतेसाठी तातडीने उपाययोजना

दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी चारा उपलब्ध करून देण्यास विशेष प्राधान्य द्यावे. शेतकऱ्यांना चारा लागवडीसाठी आवश्यक बियाणे तातडीने उपलब्ध करून द्यावे. चारा लागवडीचे क्षेत्र वाढविण्यासाठी संबंधित विभागांनी शेतकऱ्यांशी संपर्क साधून त्यांना प्रोत्साहित करावे.

टंचाईग्रस्त गावांमध्ये तहसीलदार आणि गटविकास अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेटी देऊन परिस्थितीची पाहणी करावी आणि आवश्यक उपाययोजना कराव्यात.

निधी वितरणातील विलंब खपवून घेणार नाही

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना जाहीर करण्यात आलेल्या पाच हजार रुपयांच्या अग्रीम मदतीचे वाटप कुठेही प्रलंबित असल्यास त्यामागील अडचणी तातडीने दूर कराव्यात. पात्र लाभार्थ्यांना मदत वेळेत मिळाली पाहिजे.

शासनस्तरावर कोणतीही कामे किंवा प्रस्ताव प्रलंबित असल्यास त्याची माहिती तातडीने सादर करावी. संबंधित कामांचा शासनस्तरावर पाठपुरावा करून ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महापालिका आणि नगरपालिकांनी पाणीपट्टी वसुलीकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. त्यासाठी विशेष वसुली मोहीम राबवावी. विजेअभावी कोणतीही पाणीपुरवठा योजना बंद राहणार नाही, यासाठी संबंधित विभागांनी दक्षता घ्यावी.

* लो क प्र ति नि धीं ना विश्वासात घ्या; नागरिकांशी थेट संवाद साधा*

दुष्काळ निवारणाची कामे करताना स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घ्यावे. नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घ्याव्यात. कामांच्या अंमलबजावणीत अनावश्यक विरोध निर्माण होणार नाही, याची दक्षता घ्यावी. शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या तक्रारींना तातडीने प्रतिसाद देऊन त्यांचे प्रश्न सोडवावेत. कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर तातडीने कारवाई करण्यात यावी, असा इशाराही त्यांनी दिला.

जिल्हा वार्षिक योजनेचा शंभर टक्के निधी खर्च करा

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता तातडीने घेऊन प्रलंबित असलेली कामे वेळेत पूर्ण करावीत. मंजूर निधीचा शंभर टक्के विनियोग होईल, याकडे विभागप्रमुखांनी विशेष लक्ष द्यावे. जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून दुष्काळ निवारणाची आवश्यक कामे प्रस्तावित करून त्यांची अंमलबजावणी वेळेत करावी. विकासकामांमध्ये गुणवत्तेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

बालविवाह रोखण्यासाठी विशेष दक्षता; पीसीपीएनडीटी कायद्याची कठोर अंमलबजावणी

जिल्हा बालविवाहमुक्त करण्यासाठी प्रशासनाने प्राधान्याने कार्यवाही करावी. ग्रामपंचायत, पोलीस पाटील आणि आशा, अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून गावपातळीवर बालविवाह रोखण्यासाठी सतत लक्ष ठेवावे. बालविवाहाची माहिती मिळताच तातडीने हस्तक्षेप करून प्रतिबंधात्मक कार्यवाही करावी. जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण कमी करण्यासाठी जनजागृती आणि प्रभावी देखरेख करावी.

तसेच पीसीपीएनडीटी कायद्याची कठोर अंमलबजावणी करून बालविवाहांना आळा घालावा. संबंधित यंत्रणांनी नियमित तपासणी आणि आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी दिले.

शिक्षण, आरोग्य आणि पोषणाकडे विशेष लक्ष द्या

शासनाच्या शाश्वत विकास ध्येयांतर्गत शिक्षण, आरोग्य आणि पोषण या महत्त्वाच्या बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करावे. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळत आहे का, याची खातरजमा करावी. शाळा, अंगणवाड्यांच्या इमारती नादुरुस्त असल्यास त्यांची तातडीने दुरुस्ती करावी.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात सर्व ग्रामपंचायतींचा सहभाग सुनिश्चित करून अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी. प्रत्येक गावात स्मशानभूमीची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी.

प्लास्टिक निर्मूलन आणि वृक्षलागवडीवर भर

सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटच्या (घनकचरा व्यवस्थापन) माध्यमातून पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, महापालिका आणि नगरपालिका यांनी संयुक्तपणे प्रयत्न करावेत. प्लास्टिक निर्मूलनासाठी विशेष मोहीम राबवावी. सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणाऱ्यांविरुद्ध दंडात्मक तसेच आवश्यकतेनुसार गुन्हे दाखल करण्याची कार्यवाई करावी. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करून पर्यावरण संवर्धनाला चालना द्यावी.

नागरिकांना शासकीय सेवा वेळेत मिळाव्यात

विविध सेवा केंद्रांच्या माध्यमातून नागरिकांना दिल्या जाणाऱ्या शासकीय सेवांमध्ये कोणताही विलंब होणार नाही, याची दक्षता घ्यावी. नागरिकांची प्रलंबित कामे वेळेत पूर्ण करावीत. प्रत्येक विभागाने आपल्या कामकाजाचा नियमित आढावा घेऊन नागरिकांना अधिक सुलभ आणि तत्पर सेवा उपलब्ध करून द्याव्यात, असे निर्देश डॉ. पुलकुंडवार यांनी दिले.

दुष्काळ निवारण ही केवळ एका विभागाची जबाबदारी नसून संपूर्ण प्रशासनाची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे सर्व विभागप्रमुखांनी समन्वयाने काम करून प्रत्येक उपाययोजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी. कागदोपत्री कार्यवाही न करता नागरिकांना प्रत्यक्ष दिलासा मिळेल, अशा पद्धतीने कामे पूर्ण करावीत, असे स्पष्ट निर्देश या आढावा बैठकीतून विभागप्रमुखांना देण्यात आले.



मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911